**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापी**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

संदर्भ : एसएनडीटी/ परीक्षा/ शुल्क माफी / २०१९-२०/३३१ दिनांक : २५.११.२०१९

प्रति,

मा. प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

विषय :- विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत........

संदर्भ :- १. शासन परिपत्रक क्र. शुल्क-५२१८/प्र.क्र.३११/मशि-२, दिनांक २१ नोव्हेंबर, २०१९
२.शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र.३५३/तांशि-४, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९
३.शासन पत्र क्र. शुल्क-२०१९/प्र.क्र.३५३/विशि-३, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१९

मा. महोदय,

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या परिपत्रक क्र. १ व २ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सर्व अकृषि विद्यापीठांना कळविण्यात आलेले आहे की, महसूल व वन विभागाच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०१९ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३४ जिल्ह्यातील ३२५ तालुक्यांमधील पिकांचे व बहुवर्षीय पिकांचे नुकसान झालेल्या ज्या शेतक-यांच्या पाल्यांनी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांकरीता प्रवेश घेतलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षातील परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे. तसेच उपरोक्त शासन परिपत्रकाच्या दिनांकापर्यंत ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे त्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क संबंधित संस्थेमार्फत परत करण्यात यावे असे सूचित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाची खालील संचलित व संलग्नित महाविद्यालये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित येत असून, सदर महाविद्यालयांत शिकत असणा-या विद्यार्थिनी महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातील आहेत.

| अनु. क्र. | महाविद्यालय | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | उषा मित्तल इन्स्टीटयूट ऑफ टेक्नॉलॉजी जुहू, मुंबई | बी.टेक<br>एम.टेक |
| २ | लीलाबाई ठाकरसी कॉलेज ऑफ नर्सिंग, चर्चगेट, मुंबई | बी.एस्सी (नर्सिंग)<br>एम.एस्सी (नर्सिंग) |
| ३ | सी.यु.शाह कॉलेज ऑफ फार्मसी, जुहू, मुंबई | बी.फार्म<br>एम.फार्म |

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. १ व २ नुसार वर उल्लेख केलेल्या महाविद्यालयांना विद्यापीठाने, जून ते सप्टेंबर कालावधीत पर्जन्य तूट व अनुषंगिक बाबीमुळे प्रभावित झालेल्या आंबेजोगाई जि. बीड व परांडा, जि. उस्मानाबाद या दोन तालुक्यातील तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रीवादळामुळे निर्माण परिस्थितीमुळे झालेल्या आपदग्रस्त तालुक्यामधील महाविद्यालयायीन विद्यार्थिनींचे परीक्षा शुल्क माफी संबंधी सूचना करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार संबंधित महाविद्यालयाकडून परीक्षा शुल्क माफीसंबंधी प्राप्त झालेले प्रस्ताव तंत्रशिक्षण संचालनास सादर करण्यात येतील.

कळावे,

आपला विश्वासू,

२६/११/१९

(डॉ. सुभाष वाघमारे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव रवाना

१. मा. कुलगुरु, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई
२. मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
३. म. संचालक, कला संचालनालय, मुंबई.